ePaper

# अमेरिकेच्या कडक व्हिसा नियमांवर एस. जयशंकर यांची मार्को रुबिओंबरोबर चर्चा



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार | दि. 25 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 2 वरुन...

महामार्गावरून शहरापर्यंत थेट मेट्रोने प्रवास!

## सेवामुक्त युद्धनौका ‘आयएनएस गुलदार’ निवती समुद्रतळाशी यशस्वीपणे स्थापित!

# इबोलाचा हाहाकार!



**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**डब्ल्यूएचओने (WHO) काँगोचे लोकशाही प्रजासत्ताक (DRC) आणि युगांडातील उद्रेकाची गंभीर दखल घेत इबोला आजाराला ‘आंतरराष्ट्रीय चिंतेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी’ (PHEIC) म्हणून अधिकृतपणे घोषित केले आहे. आरोग्य संघटनेच्या या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध प्रतिक्रिया उमटल्या असून, भारत सरकारनेही प्रवासाबाबत खबरदारीची नियमावली (ट्रॅव्हल ॲडव्हायझरी) जारी केली आहे. हा उद्रेक इबोला विषाणूच्या दुर्मिळ ‘बुंदिबुग्यो’ (BUNDIBUGYO) स्ट्रेनमुळे झाला आहे, ज्यावर सध्या कोणतेही मान्यताप्राप्त लस किंवा उपचार उपलब्ध नाहीत.**

काँगोच्या तीन प्रांतांमध्ये ८६७ संशयित रुग्णांपैकी २०४ मृत्यूंची नोंद झाली आहे. २०१४ ते २०१६ मधील पश्चिम आफ्रिकेतील साथीनंतरचा हा इतिहासातील दुसरा सर्वात मोठा इबोला उद्रेक ठरला आहे. या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर, काँगो आणि युगांडाच्या सीमांना लागून असलेल्या दक्षिण सुदानसह इतर शेजारील देशांमध्ये संसर्ग पसरण्याचा धोका सर्वाधिक असल्याचे सांगण्यात येत आहे.

इबोलाचा उद्रेक सामान्यतः आफ्रिकेच्या काही भागांपुरताच मर्यादित असतो, परंतु आंतरराष्ट्रीय प्रवासामुळे कधीकधी संक्रमित व्यक्ती इतर देशांच्या सीमा ओलांडून प्रवास करू शकतात. त्यामुळे, जगभरातील विमानतळ, रुग्णालये आणि आरोग्य अधिकारी आता कडक तपासणी आणि विलगीकरण (आयसोलेशन) नियमांचे पालन करत आहेत. भारताने यापूर्वीही इबोला उद्रेकादरम्यान विमानतळांवरील पाळत आणि तपासणी अधिक कडक केली होती. तज्ज्ञांच्या मते, भारतात इबोलाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होण्याचा धोका कमी आहे, कारण हा विषाणू कोविड-१९ प्रमाणे हवेतून पसरत नाही.



इबोला हा इबोला विषाणूच्या बुंदिबुग्यो स्ट्रेनच्या संसर्गामुळे होणारा एक गंभीर व्हायरल हॅमोरेजिक फीव्हर (रक्तस्रावी ताप) आहे. हा अत्यंत गंभीर आजार असून यात मृत्यूचा दर खूप जास्त असतो. सर्वात चिंतेची बाब म्हणजे, या विशिष्ट स्ट्रेनमुळे होणाऱ्या इबोला आजाराला रोखण्यासाठी किंवा त्यावर उपचार करण्यासाठी कोणतीही लस किंवा विशिष्ट औषध उपलब्ध नाही. त्यामुळे या आजाराचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य अधिकाऱ्यांना पूर्णपणे सार्वजनिक आरोग्य उपाययोजनांवरच अवलंबून राहावे लागत आहे.

## ट्रॅव्हल ॲडव्हायझरी जारी

भारत सरकारने एका अधिसूचनेद्वारे सर्व भारतीय नागरिकांना पुढील आदेश येईपर्यंत काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदानचा अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, सध्या या देशांमध्ये राहणाऱ्या किंवा प्रवास करणाऱ्या भारतीय नागरिकांना स्थानिक प्रशासनाने दिलेल्या सार्वजनिक आरोग्य मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचा आणि अतिरिक्त खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## आफ्रिकेत संसर्ग कसा पसरत आहे?

डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोमध्ये (डीआरसी) इबोलाची अंदाजे ८६७ संशयित प्रकरणे आणि २०४ मृत्यूंची नोंद झाली आहे. हा विषाणू आता तीन प्रांतांमध्ये पसरला असून, शेजारील युगांडामध्ये दोन प्रकरणे नोंदवली गेली आहेत. हा संसर्ग इबोलाच्या बुंदीबुग्यो नावाच्या दुर्मिळ प्रकारामुळे होतो, असे मानले जाते, ज्यासाठी अद्याप कोणतीही विशिष्ट लस उपलब्ध नाही. याचा मृत्यूदर सुमारे ५० टक्के असल्याचे सांगितले जाते. इबोला विषाणू सामान्यतः संक्रमित व्यक्तीचे रक्त, घाम, उलटी आणि इतर शारीरिक द्रव्यांच्या संपर्कातून पसरतो. सुरुवातीच्या लक्षणांमध्ये तीव्र ताप, अशक्तपणा, उलटी, जुलाब आणि गंभीर प्रकरणांमध्ये अंतर्गत किंवा बाह्य रक्तस्त्राव यांचा समावेश असू शकतो.

# महामार्गावरून शहरापर्यंत थेट मेट्रोने प्रवास!

## स्वारगेट-कात्रज भुयारी मार्ग आणि वनाझ-चांदणी चौक उन्नत मार्गिकेची कामे सुरू

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यात मेट्रोच्या 'फेज 1'ची कामं पूर्ण होत आली आहेत. मुंबई-बंगळुरू महामार्गावरील चांदणी चौक आणि कात्रजपर्यंत मेट्रोच्या बांधकामाला सुरूवात झाली आहे. पुणे आणि स्वारगेटमध्ये भुयारी बोगद्यांमध्ये मेट्रोचा मार्ग तयार होणार आहे. या प्रकल्पाचं काम 2029पर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे येत्या काही वर्षात पुणेकर गारेगार मेट्रोमधून शहराबाहेरपर्यंत प्रवास करू शकतात.**



पीसीएमसी ते स्वारगेट, पुणे मेट्रो लाइन 1चा विस्तार सुरू आहे. स्वारगेटते कात्रज मार्गावर कामाला सुरूवात झाली आहे. हा मार्ग पूर्णपणे भुयारी असून शहराच्या अंतर्गत भागांखालून प्रवास शक्य होणार आहे. त्याशिवाय, मेट्रो लाइन 2, रामवाडी ते वनाझ धावते. या मेट्रोचा वनाझ ते चांदणी चौकपर्यंत विस्तार होणार आहे. ही मार्गिका पूर्णपणे उन्नत असेल. सध्या एकूण आठ नव्या स्थानकांचं काम सुरू आहे. यापैकी स्वारगेट ते कात्रजपर्यंत 4 स्थानकं आहेत ( मार्केट यार्ड, बिब्वेवाडी, पद्मावती, बालाजीनगर आणि कात्रज).

मेट्रो लाइन 1वरील कात्रज स्थानक जंक्शन असेल. पाच स्थानकांपैकी सर्वात शेवटचं स्थानक असून हे पुणे-मुंबई महामार्गाला मुंबई-बंगळुरू बायपास आणि कात्रज-कोंढवा रस्त्यापर्यंत जोडेल. या भुयारी मार्गाचं काम कात्रज येथील पीएमपी बस थांब्याच्या ठिकाणीच होत आहे. त्यामुळे त्या ठिकाणांवरील तीन बस थांबे हलवण्यात आले आहेत. शिवाय मार्गावरील वाहनांची वाहतूकही वळवली आहे. पीसीएमसी ते स्वारगेच मेट्रो लाइन गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असून यावरती आता स्थानकांची वाढ होणार आहे.

### बसचे मार्ग वळवले

भुयारी मार्गाचं काम सध्या सुरू आहे. त्यामुळे मार्केट यार्ड आणि बिब्वेवाडी स्थानकांच्या परिसरातील वाहतूक वळवळी आहे. बसचे मार्गही बदलण्यात आले आहेत. त्यामुळे काही काळ नागरिकांना गैरसोय होऊ शकते. स्वारगेट आणि कात्रज येथील भुयारी स्थानकांसाठी दोन टीबीएम तयार करण्यात येणार आहेत. त्यानंतर कात्रज मार्गावर विस्तार सुरू होईल. पुढील काही महिन्यात हे काम सुरू होण्याची शक्यता आहे. या मेट्रो मार्गाच्या बांधकामासाठी महा मेट्रो आणि पीएमपी प्रशासन एकत्रपणे काम करत आहेत. पीएमपी बस थांब्यांसह बीआरटीएस बस थांबेही तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आले आहेत. बाजूला असलेल्या पदपथावर हे थांबे वळवण्यात आले आहेत. शिवाय मुंबई-बंगळुरू बायपास जवळ असलेल्या चांदणी चौकापर्यंत रामवाडी ते वनाझ मेट्रो लाइन 2चा विस्तार करण्यात येत आहे. हा मार्ग 2028पर्यंत पूर्ण करण्याचं महा मेट्रोचं उद्दिष्ट आहे.

## पुण्यात घरभेटींचे काम संथ; 11 हजार प्रगणकांवर प्रशासनाचा कडक इशारा

**महाईन्यूज । पुणे**

**देशासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या ‘जनगणना 2027’ च्या पहिल्या टप्प्यातील घरयादी तयार करण्याचे काम पुण्यात संथ गतीने सुरू असल्याबद्दल प्रशासनाने कमालीची कडक भूमिका घेतली आहे. प्रत्यक्ष घरभेटींद्वारे माहिती संकलनाचे काम अपेक्षित गतीने होत नसल्याचे समोर आल्यानंतर, महापालिका प्रशासनाने शनिवारी सकाळी गणेश कला क्रीडा केंद्र येथे तब्बल 1,600 पर्यवेक्षकांची तातडीची आढावा बैठक घेऊन कामचुकारांना तीव इशारा दिला आहे.**




या बैठकीत शहरात कार्यरत असलेल्या सुमारे 11,000 प्रगणकांकडून सुरू असलेल्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये अनेक भागांत प्रत्यक्ष घरभेटी आणि माहिती संकलनाची प्रगती असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर, प्रगणकांना क्षेत्रीय स्तरावर काम करताना येणाऱ्या विविध तांत्रिक अडचणी, जनगणनेच्या मोबाईल ॲपचा वापर आणि कामकाजाची प्रत्यक्ष प्रक्रिया यावर चर्चा करण्यात आली, तसेच त्याची सविस्तर चर्चा करण्यात आली.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे आणि जनगणना संचालनालयाचे सहसंचालक राजेश भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली. या वेळी सर्व चार्ज ऑफिसर्स आणि पर्यवेक्षकांना आपापल्या कार्यक्षेत्रातील प्रगणकांवर दररोज काटेकोर लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले. दररोजच्या कामाचा अहवाल सादर करून घरभेटीचे नियोजनबद्ध काम निश्चित कालमर्यादेत आणि अत्यंत अचूकतेने पूर्ण करण्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या.

जनगणनेचे हे काम देशहिताचे व राष्ट्रीय महत्त्वाचे असल्याने नागरिकांनी आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकांना कोणतीही भीती न बाळगता संपूर्ण आणि अचूक माहिती देऊन या राष्ट्रीय उपक्रमात आपले योगदान द्यावे, असे आवाहन महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी नवल किशोर राम आणि अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी नागरिकांना केले आहे.

### काम न केल्यास थेट तुरुंगवास!

बैठकीमध्ये विनापरवानगी गैरहजर राहणाऱ्या आणि कामात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत प्रशासनाने तीव संताप व्यक्त केला. ‘जनगणना कीट’ ताब्यात घेऊनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात न करणारे, तसेच प्रशिक्षणाकडे पाठ फिरवणाऱ्या प्रगणक आणि पर्यवेक्षकांवर कडक कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. संबंधितांनी तत्काळ कामावर रुजू न झाल्यास त्यांच्यावर ‘जनगणना कायदा 1948’ मधील तरतुदींनुसार कडक शिस्तभंग आणि थेट फौजदारी कारवाई केली जाईल, असा सज्जड दम प्रशासनाने दिला आहे.

# लोकमान्य हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांचे तीव्र आंदोलन

## कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांचा हॉस्पिटलला सोमवार पर्यंतचा अल्टिमेटम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**गेल्या ४० वर्षांपासून रुग्णसेवेत अग्रेसर असलेल्या चिंचवड येथील लोकमान्य हॉस्पिटलमधील जवळपास ४०० परमनंट (कायमस्वरूपी) कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. गेल्या १० ते ११ महिन्यांचा थकीत पगार आणि कोरोना काळातील हक्काचे मानधन न मिळाल्यामुळे या संतप्त कर्मचाऱ्यांनी हॉस्पिटल प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडले आहे. या आंदोलन स्थळी उपस्थित राहून राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी व्यवस्थापनाच्या मनमानी कारभारावर कडाडून टीका केली. यावेळी सर्व कामगारांनी काळया फिती बांधून हॉस्पिटलचा त्रीव निषेध व्यक्त केला.**





यावेळी मीडिया प्रतिनिधीशी बोलताना कामगार नेते यशवंतभाऊ भोसले म्हणाले की,व्ही. जी. वैद्य (चेअरमन) आणि एन. व्ही. वैद्य (प्रमुख डायरेक्टर) यांच्या मार्गदर्शनाखाली चालणारे हे ट्रस्टचे हॉस्पिटल अचानक दुसऱ्या व्यवस्थापनाकडे हस्तांतरित (हँडओव्हर) करण्यात आले आहे. हे हॉस्पिटल आता प्रसिद्ध 'सह्याद्री ग्रुप'ने विकत घेतल्याचे समजते. हॉस्पिटलचे हस्तांतरण होताच, नव्या व्यवस्थापनाने "आम्हाला परमनंट कर्मचारी नको असून सर्व जागा कंत्राटी (कॉन्ट्रॅक्ट) पद्धतीने भरायच्या आहेत," अशी भूमिका घेतली. यामुळे वर्षानुवर्षे आणि विशेषतः कोविडच्या अत्यंत कठीण काळात स्वतःच्या प्राणाची बाजी लावून काम करणाऱ्या ४०० कामगारांना एका रात्रीत कामावरून काढून देशोधडीला लावण्यात आले आहे.

कामगारांच्या या न्याय्य हक्कांसाठी कामगार आयुक्त, तसेच विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्या उपस्थितीत अनेक बैठका आणि मध्यस्थीचे प्रयत्न झाले. अगदी पोलिसांनीही मध्यस्थी करत "कामगारांचा किमान १० महिन्यांचा हक्काचा पगार तरी द्या," अशी समज व्यवस्थापनाला दिली होती. मात्र, मुजोर व्यवस्थापनाने या सर्व प्रयत्नांना केराची टोपली दाखवली आहे. सध्या मूळ व्यवस्थापनातील प्रमुख अधिकारी पळून गेले असून कामगारांना वाऱ्यावर सोडण्यात आले आहे.कामगारांनी एकच चूक केली की त्यांनी जुनी युनियन सोडून बाहेरच्या युनियनचा हात धरला आणि तिथेच या ४०० कामगारांचा घात झाला. आज इंडस्ट्रियल कोर्टात अडीच वर्षांपासून या कामगारांना फक्त तारखांवर तारखा देऊन मॅनेज केले जात आहे. महाराष्ट्रात जर असेच चित्र राहिले, तर कामगारांचा असंतोष तीव्र होईल.

सध्या व्यवस्थापनाचे प्रतिनिधी सुनील काळे (ज्यांना स्वतःलाही १० महिने पगार मिळालेला नाही) यांनी पोलिसांसोबत झालेल्या चर्चेत सोमवारपर्यंत पगार कधी देणार याबाबीचा निर्णय कळवण्याचे आश्वासन दिले आहे.आंदोलकांनी स्पष्ट केले आहे की, सह्याद्री ग्रुपचे चेअरमन चारू आपटे हे एक सभ्य आणि नावाजलेले गृहस्थ आहेत. त्यामुळे ते या कामगारांच्या प्रश्नावर सहानुभूतीने विचार करतील आणि कर्मचाऱ्यांचा १० महिन्यांचा पगार देऊन त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेतील, अशी आशा कामगारांना आहे. मात्र, सोमवारी (दि.२५) जर पगार मिळाला नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी दिला आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 9 जूनपर्यंत निर्बंध; मोर्चे, सभा आणि घोषणाबाजीवर बंदी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आगामी सण-उत्सव, धार्मिक कार्यक्रम तसेच सार्वजनिक ठिकाणी होणारी गर्दी लक्षात घेता पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 मधील कलम 37 (1) व (3) अंतर्गत विशेष आदेश जारी केले आहेत. हे आदेश 27 मे 2026 रोजी मध्यरात्री 12.01 वाजल्यापासून लागू होणार असून 9 जून 2026 रोजी रात्री 12 वाजेपर्यंत संपूर्ण पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात प्रभावी राहणार आहेत.**



### शांतता भंग केल्यास कारवाई

पोलीस प्रशासनाने नागरिकांना शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 135 अन्वये कारवाई करण्यात येणार असून संबंधित व्यक्तींना शिक्षेस सामोरे जावे लागू शकते.

जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार या कालावधीत कोणत्याही व्यक्तीस दाहक पदार्थ, स्फोटक साहित्य किंवा सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण करणारे पदार्थ बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच दगड, शस्त्रे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका किंवा इजा पोहोचविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही वस्तूंसह फिरण्यास बंदी घालण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी प्रतिकात्मक प्रेतदहन, नेत्यांच्या प्रतिमांचे दहन किंवा आक्षेपार्ह प्रदर्शन करण्यावरही निर्बंध लावण्यात आले आहेत.

याशिवाय मोठ्या आवाजात घोषणा देणे, वाद्य वाजवणे, आक्षेपार्ह अथवा समाजात तेढ निर्माण करणारी भाषणे करणे, राज्याच्या सुरक्षिततेला बाधा पोहोचविणारे साहित्य तयार करून त्याचा प्रसार करणे यावरही बंदी घालण्यात आली आहे. सार्वजनिक शांतता भंग होईल किंवा नागरिकांमध्ये तणाव निर्माण होईल अशा कोणत्याही प्रकारच्या कृत्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

कलम 37 (3) अंतर्गत पाचपेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव करण्यास मनाई करण्यात आली असून पोलीस आयुक्तांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय सभा, मोर्चे किंवा मिरवणुका काढता येणार नाहीत. त्यामुळे विविध संघटना, राजकीय पक्ष व सामाजिक संस्थांना कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी पोलीस प्रशासनाची परवानगी घेणे बंधनकारक असणार आहे.

दरम्यान, शासनाच्या सेवेत असलेल्या तसेच वरिष्ठांच्या आदेशानुसार शस्त्र बाळगण्याची अधिकृत परवानगी असलेल्या व्यक्तींना या आदेशातून सूट देण्यात आली आहे.



## भूमिका

**जागतिक व्यवस्थेत पाश्चिमात्य वर्चस्वाला पर्याय उभा करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या BRICS संघटनेसमोर आता अंतर्गत मतभेदांचे गंभीर आव्हान उभे राहत आहे. नवी दिल्लीत पार पडलेल्या ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत हे स्पष्टपणे दिसून आले. मूळतः आर्थिक सहकार्य आणि 'ग्लोबल साऊथ'चा आवाज म्हणून पुढे आलेल्या या संघटनेत आता भू-राजकीय हितसंबंधांचे संघर्ष अधिक ठळक होत आहेत.**

# ब्रिक्ससमोरील अंतर्गत विसंवादाचे आव्हान




परिणामी, संयुक्त निवेदन जाहीर करण्यात आलेले अपयश हे केवळ राजनैतिक अडथळे नसून ब्रिक्सच्या भविष्यासमोरील मोठा इशारा मानावा लागेल.

इराण-इस्त्रायल-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर बैठकीत वातावरण अधिक तापले. इराणने अमेरिका आणि इस्त्रायलच्या कारवायांचा ब्रिक्सने निषेध करावा, अशी आक्रमक मागणी केली. दुसरीकडे संयुक्त अरब अमिरातीने हा प्रश्न आखाती सुरक्षेच्या दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न केला. या दोन सदस्य राष्ट्रांतील परस्परविरोधी भूमिका ब्रिक्समधील वाढत्या विसंगतीचे प्रतीक ठरल्या. एका बाजूला पाश्चिमात्य प्रभावाला विरोध करणारे देश, तर दुसऱ्या बाजूला अमेरिकेशी घनिष्ठ संबंध राखणारे सदस्य — अशा परस्परविरोधी हितसंबंधांमुळे ब्रिक्समध्ये एकसंध धोरण तयार करणे अधिक कठीण होत चालले आहे.

ब्रिक्सचा विस्तार हा संघटनेच्या वाढत्या प्रभावाचा पुरावा मानला जात असला, तरी त्यातून निर्माण होणारे अंतर्गत विरोधाभासही दुर्लक्षित करता येणार नाहीत. नव्या सदस्यांच्या आर्थिक, राजकीय आणि सुरक्षाविषयक प्राधान्यक्रमांमध्ये मोठी तफावत आहे. त्यामुळे संघटना एका स्पष्ट ध्येयाऐवजी विविध अजेंड्यांचे व्यासपीठ बनण्याचा धोका निर्माण झाला आहे. आर्थिक सहकार्यापासून सुरुवात झालेला हा मंच आता जागतिक संघर्षांच्या ओझ्याखाली दबला जाताना दिसतो.

या संपूर्ण घडामोडीत भारताची भूमिका विशेष महत्त्वाची ठरते. ब्रिक्सचे यजमानपद सांभाळताना भारताने संतुलित आणि स्वतंत्र भूमिका घेणे अपेक्षित होते. मात्र संयुक्त अरब अमिरातीवरील इराणी हल्ल्यांचा निषेध करताना, यापूर्वी इराणवरील अमेरिका-इस्त्रायल कारवाईवर तितकीच ठाम प्रतिक्रिया न देणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणातील विसंगती अधोरेखित करते. भारत एका बाजूला ब्रिक्समध्ये असून दुसऱ्या बाजूला क्वाडसारख्या अमेरिकाप्रणीत गटाचाही भाग आहे. त्यामुळे मध्यपूर्वेतील प्रश्नांवर भारताला अत्यंत सावध संतुलन राखावे लागत आहे.

तथापि, अध्यक्षीय निवेदनातून भारताने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद सुधारणा, मुत्सद्देगिरीद्वारे संघर्ष निवारण, सागरी सुरक्षा आणि बहुपक्षीय सहकार्य यांसारखे मुद्दे पुढे आणले, ही सकारात्मक बाब आहे. परंतु भविष्यात ब्रिक्स प्रभावी ठरायचा असेल, तर सदस्य राष्ट्रांनी केवळ पाश्चिमात्य विरोधी भूमिका घेण्यापेक्षा समान धोरणात्मक दिशा निश्चित करणे आवश्यक ठरेल. अन्यथा, वाढती सदस्यसंख्या असूनही ब्रिक्स अंतर्गत मतभेदांमुळे कमकुवत होण्याचा धोका अधिक वाढेल.

## प्रासंगिक »

### सहाय्य

**एक आंधळा व एक लंगडा भिकारी एक गावात एकत्र भेटतात. सुख-दुःखाच्या गप्पा सुरु होतात.**

आंधळा म्हणतो, "मला रस्ताही नीट समजत नाही, दिसत नाही आणि लोकही फसवतात." लंगडा म्हणतो, "अरे, माझी व्यथा वेगळीच आहे. मला रस्ता दिसतो. कुणी खोटे पैसे देऊन फसवतही नाही. पण, मला चालण्याचा खूप त्रास होतो."

दोघे मिळून एक युक्ती करतात. लंगडा आंधळ्याला म्हणतो, "आपण असं करू. माझ्याजवळ एक शक्ती आहे. आपण एकत्र आलो, तर दोघांची काम होईल. आपल्याला ज्या रस्त्याने जायचं आहे, तो रस्ता, वळणं मला दिसतात. मी तुझ्या खांद्यावरती बसतो आणि तुला वळायचं कुठे, कसं हे सगळं सांगतो, म्हणजे तुझंही काम होईल आणि माझंही. वाटेत तू थकशील तेव्हं थोडे बसू. विश्रांती घेऊ.

आंधळ्याने व लंगड्याने एकमेकांच्या शक्ती एकमेकांना दिल्या आणि मग त्यांचे उर्वरित आयुष्य चांगले गेले.

तात्पर्य - कोणीही परिपूर्ण नसतो. एकमेकांना सहाय्य करीत जगत राहिलो, तर आयुष्य सुखात व्यतीत होते.

महाराष्ट्रातील यंदाचा खरीप हंगाम हा केवळ शेतीपुरता मर्यादित विषय राहिलेला नाही, तर तो राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेची मोठी परीक्षा ठरत आहे.

# शेतकऱ्यांना गरज खरिपात तत्काळ मदतीची!

'एल निनो'चे सावट, खतटंचाई, डिझेल पुरवठ्याची अनिश्चितता आणि बदलते हवामान या साऱ्यांनी शेतकरी आधीच चिंतेत आहे. राज्य सरकारने खरीप नियोजनासाठी बैठका घेतल्या, आदेश दिले आणि विविध उपाययोजना जाहीर केल्या असल्या तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत तत्काळ मदत पोहोचणे हेच सर्वात महत्त्वाचे ठरणार आहे.

महाराष्ट्रातील बहुतांश शेती अजूनही पावसावर अवलंबून आहे. मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागांमध्ये खरीप हंगाम ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. मात्र हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. पूर्वी सलग आणि संतुलित पडणारा पाऊस आता काही दिवसांच्या अतिवृष्टीत केंद्रित होत आहे. जूनमध्ये पेरण्या झाल्यानंतर जुलै-ऑगस्टमध्ये पावसाचा खंड पडतो आणि उभी पिके करपू लागतात.



त्यानंतर अचानक अतिवृष्टी होऊन पूरस्थिती निर्माण होते. परिणामी, शेतकऱ्याला दुष्काळ आणि पूर या दुहेरी संकटाचा सामना करावा लागत आहे.

यंदा 'एल निनो'मुळे कमी पावसाची शक्यता अधिक गंभीर मानली जात आहे. 2002, 2009 आणि 2015 या एल निनो वर्षांत महाराष्ट्राने मोठे दुष्काळ अनुभवले होते. त्यामुळे सरकारची चिंता रास्त आहे. मात्र केवळ बैठका घेऊन संकट टळणार नाही. कमी पाण्यावर येणाऱ्या बियाण्यांचे वितरण, पर्यायी पीक पद्धती आणि जलसंधारणाच्या उपाययोजना तातडीने आणि प्रभावीपणे राबवाव्या लागतील.

खतटंचाई हा आणखी एक गंभीर मुद्दा आहे. जागतिक संघर्षांमुळे खत पुरवठा विस्कळीत झाला असून काळाबाजाराचा धोका वाढला आहे. शेतकऱ्यांना वेळेत आणि योग्य दरात खते मिळाली नाहीत, तर उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होईल. त्याचबरोबर डिझेल दरवाढ आणि पुरवठा अनिश्चिततेमुळे सिंचन खर्चही वाढण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर सरकारने केवळ नियोजनावर न थांबता शेतकऱ्यांना प्रत्यक्ष आर्थिक आधार देणे आवश्यक आहे. विश्वासार्ह पीकविमा, तातडीची नुकसानभरपाई, वेळेत कर्जपुरवठा आणि हमीभाव या गोष्टी आता अत्यावश्यक बनल्या आहेत. हवामान बदलाच्या वाढत्या संकटात शेतकरी टिकला, तरच ग्रामीण अर्थव्यवस्था टिकेल. त्यामुळे यंदाच्या खरीपात घोषणांपेक्षा त्वरित आणि प्रभावी अंमलबजावणीचीच खरी गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



करावें गोमटें ।
बाळा माते तें उमटे ॥१॥

आपुलिया जीवाहूनी ।
असे वाल्हें तें जननी ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा!

## राज्यातील 5 खासदारांचं नाव देशाच्या संसदेत गाजणार, 'संसद रत्न' पुरस्कार जाहीर

**महाईन्यूज । मुंबई**

**आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी महत्त्वाच्या विविध मुद्यांवर तसेच अर्थसंकल्पावर, सरकारच्या धोरणांवर बाजू भक्कमपणे मांडून संसदेसह देशाचे लक्ष वेधणारे, विविध विभागांवर प्रश्नोत्तरे विचारणारे, संसदेतील उपस्थितीत अव्वल असणारे ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांना सलग दुसऱ्या वर्षी मानाचा 'संसद रत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. आपल्या खासदारकीच्या पहिल्याच टर्ममध्ये नरेश म्हस्के यांना पहिला 'संसद रत्न' मागील वर्षी पुरस्कार प्राप्त झाला होता. यावर्षी देखील सलग दुसऱ्यांदा हा पुरस्कार जाहीर झाल्याने ठाणेकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तसेच संसदेत आपल्या अभ्यासपूर्ण आणि धडाकेबाज भाषणांनी विरोधकांची झोप उडविणारे खासदार श्रीकांत शिंदे यांनाही दुसऱ्यांदा 'संसद रत्न ' पुरस्कार जाहीर झाला आहे.**



संसद रत्न पुरस्कारांचा १६ वा सोहळा जुलै २०२६ मध्ये नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात येणार असून, यावेळी १५० वा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. संसद रत्न पुरस्काराचे संस्थापक प्राइम पॉइंट फॉऊंडेशनचे श्रीनिवासन आणि संसद रत्न पुरस्कार समितीच्या अध्यक्षा प्रियदर्शनी राहुल यांनी पुरस्काराची घोषणा नवी दिल्ली येथे केली. “संसद रत्न पुरस्कार २०२६ साठी परीक्षक समितीने १० लोकसभा खासदार, २ राज्यसभा खासदार आणि ४ संसदीय स्थायी समित्यांची निवड केली आहे. यावर्षी आम्ही १५० वा पुरस्कार प्रदान करणार आहोत,” अशी माहिती संसद रत्न पुरस्कार समितीच्या अध्यक्षा प्रियदर्शनी राहुल यांनी दिली.

“वैयक्तिक श्रेणीमध्ये उत्तर प्रदेशचे जगदंबिका पाल, राजस्थानचे पी. पी. चौधरी, झारखंडचे निशिकांत दुबे आणि दुसऱ्यांदा महाराष्ट्राचे श्रीकांत एकनाथ शिंदे यांचा समावेश आहे,” असेही त्यांनी सांगितले. “याशिवाय उत्तर प्रदेशचे प्रवीण पटेल, झारखंडचे बिद्युत बरन महातो, राजस्थानचे लुम्बाराम चौधरी, महाराष्ट्राचे नरेश गणपत म्हस्के, डॉ. हेमंत विष्णू सावरा, स्मिता उदय वाघ, डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी आणि गुजरातचे नरहरी अमीन यांचीही निवड करण्यात आली आहे", अशी माहिती त्यांनी दिली.

"संसदेत बजेट अधिवेशन २०२६ अखेरपर्यंत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे विविध श्रेणींमध्ये त्यांना गौरविण्यात येणार आहे,” असे प्रियांदर्शनी राहुल यांनी नमूद केले.

उत्कृष्ट कामगिरीबद्दल चार संसदीय समित्यांनाही पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. चेन्नईस्थित प्राईम पॉईंट फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने २०१० मध्ये माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्या सूचनेनुसार संसद रत्न पुरस्काराची स्थापना केली होती. पहिल्या पुरस्कार सोहळ्याचे उद्घाटन स्वतः डॉ. कलाम यांनी केले होते. “प्राइम पॉईंट फाउंडेशनने नुकताच आपला २५ वा वर्धापन दिन साजरा केला आहे,” अशी माहिती संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष तसेच संसद रत्न पुरस्कारांचे संस्थापक श्रीनिवासन यांनी दिली.

“ज्येष्ठ पुरस्कारप्राप्त संसद सदस्य, निवृत्त घटनात्मक अधिकारी आणि शिक्षणतज्ज्ञांच्या मान्यवर परीक्षक समितीद्वारे विजेत्यांची निवड केली जाते. खासदार आणि समित्यांच्या संसदीय कामगिरीच्या आकडेवारीच्या आधारे निवड केली जाते. ही माहिती पी आर एस लेजिस्लेटिव्ह रिसर्च, लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयांकडून उपलब्ध करून दिली जाते,” असेही श्रीनिवासन यांनी सांगितले.

या पुरस्कारासाठी निवड करताना संसदेतील अधिकृत आकडेवारी, पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्च, लोकसभा आणि राज्यसभा सचिवालयातील माहितीचा आधार घेतला जातो. ज्युरीमध्ये माजी संसदीय अधिकारी, घटनातज्ज्ञ आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश असतो. त्यामुळे संसद रत्न पुरस्कार हा संसदीय क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा आणि विश्वासार्ह सन्मान मानला जातो.

### नरेश म्हस्के यांची पहिली प्रतिक्रिया

"शिवसेना मुख्यनेते आणि महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा भरभक्कम पाठिंबा, शिवसेना गटनेते खासदार श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी केलेले मार्गदर्शन, दिलेले प्राधान्य यामुळेच आज हा पुरस्कार मला जाहिर झाला आहे. मतदार राजा, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी, युवा कार्यकर्त्यांना या पुरस्काराचे मी श्रेय देत आहे", अशी प्रतिक्रिया ठाण्याचे खसदारह नरेश म्हस्के यांनी दिली.

## “युवा शक्ती ही एक राष्ट्र शक्ती”, अण्णा हजारेंचं कॉक्रोच जनता पार्टीबाबत मोठं वक्तव्य

**महाईन्यूज । अलिबाग**

**गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण देशभरात ‘कॉक्रोच जनता पार्टी’ची मोठी चर्चा सुरू आहे. सोशल मीडियावर कोट्यवधि फॉलोअर्स मिळवत देशातील तरुण पिढीला भुरळ घालणाऱ्या ‘कॉक्रोच जनता पार्टी’चे संस्थापक अभिजित दिपके यांची देखील मोठी चर्चा सुरू आहे. दरम्यान, भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका सुनावणीदरम्यान बेरोजगार तरुणांबाबत केलेल्या एका वक्तव्यानंतर ‘कॉक्रोच जनता पार्टी’ ही व्यंगात्मक राजकीय चळवळ जन्माला आली.**



याच कॉक्रोच जनता पार्टीला अवघ्या चार ते पाच दिवसांत तब्बल १ कोटींपेक्षा जास्त तरुणांनी फॉलो करत या चळवळीत सहभाग नोंदवला. या पार्टीबाबत विविध क्षेत्रातून प्रतिक्रिया येत आहेत. आता ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी देखील कॉक्रोच जनता पार्टीबाबत प्रतिक्रिया देत महत्वाचं भाष्य केलं आहे.’युवा शक्ती ही एक राष्ट्र शक्ती आहे’, असं म्हणत अण्णा हजारे यांनी सरकारला एक महत्वाचा सल्ला देखील दिला आहे.

‘झुरळ’ म्हणण्याचा उद्देश काय होता? हे आपण समजून घेणं महत्वाचं आहे. मात्र, यामध्ये एक चांगली गोष्ट आहे की, झुरळ म्हटलं असेल तरी आणि झुरळ हे नाव योग्य वाटत नसलं तरी या कॉक्रोच जनता पार्टीच्या मागे मोठ्या प्रमाणात तरुण उभे राहिले आहेत, हे जास्त महत्वाचं आहे. युवा शक्ती ही राष्ट्र शक्ती आहे. त्यामुळे सरकारने त्यांच्याकडे दुर्लक्ष करू नये. शासनाने त्यांचा अव्हेर न करता त्यांना प्रोत्साहन दिलं पाहिजे”, असं अण्णा हजारे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.




### कॉक्रोच जनता पार्टीचा संस्थापक कोण आहे?

समाजमाध्यमांवर धुमाकूळ घालणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टीची सुरुवात अभिजीत दिपके या ३० वर्षीय तरुणाने केली आहे. अभिजीत दिपके हे मूळचे छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असून ते सध्या अमेरिकेच्या बोस्टन शहरात शिक्षण घेत आहेत. भारताच्या सरन्यायाधीशांनी केलेल्या एका वक्तव्यानंतर अभिजीत दिपके यांनी ‘कॉक्रोच जनता पार्टी’ या नावाने एक वेबसाईट तयार केली आणि इन्स्टाग्राम व एक्सवर खातंही उघडलं. त्यानंतर अत्यंत कमी कालावधीतच ही व्यंगात्मक राजकीय चळवळ संपूर्ण देशभरात चर्चेचा विषय ठरली. एका वृत्तानुसार, अभिजीत दिपके यांनी पुण्यातून पत्रकारितेची पदवी पूर्ण केली आणि त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेले आहेत.

# पाकिस्तानमध्ये आत्मघातकी बॉम्बस्फोट

## क्वेटा रेल्वे स्थानकावर भीषण स्फोट; २३ जणांचा मृत्यू, ४७ जखमी

**महाईन्यूज । बलूचिस्तान**

**पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील क्वेट्टा येथील चमन फाटकजवळ छावणीकडे (कॅन्ट) जाणाऱ्या एका प्रवासी ट्रेनवर आत्मघातकी बॉम्ब हल्ला झाला असून यामध्ये किमान २३ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ४७ जण जखमी झाले आहेत. या भागात झालेल्या एका भीषण स्फोटामुळे ट्रेनचे डबे रुळावरून घसरले आणि तिथे मोठी आग लागली. बंदी घातलेल्या बलुच लिबरेशन आर्मीने या स्फोटाची जबाबदारी स्वीकारली आहे.**



"बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानच्या सुरक्षा दलांच्या हातून बीएलए (BLA) च्या दहशतवाद्यांचे मोठे नुकसान झाल्यानंतर आणि त्यांना सततचे धक्के बसल्यानंतर हे कृत्य करण्यात आले आहे", असं बीएलएने म्हटलं आहे. प्राथमिक अहवालानुसार, घटनास्थळी गोळीबाराचा आवाजही ऐकू आला. 'सीएनएन-न्यूज१८' ने (CNN-News18) विशेषरित्या मिळवलेल्या व्हिडिओ क्लिप्समध्ये बचावकार्यादरम्यान भीषण आग लागलेली आणि धुराचे लोट निघताना दिसत आहेत. रुग्णवाहिका आणि सुरक्षा दल घटनास्थळी पोहोचले असून संपूर्ण परिसराला वेढा घालण्यात आला आहे.

पाकिस्तानी वृत्तवाहिनी 'एआरवाय न्यूज' ने (ARY News) स्थानिक पोलिसांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, हा स्फोट क्वेट्टा येथील चमन फाटकजवळ झाला. या स्फोटामुळे रेल्वे ट्रॅकजवळ भीषण आग लागली, ज्यामुळे स्थानिक नागरिक, आपत्कालीन पथके आणि अग्निशामक दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळाकडे धाव घेतली. क्वेट्टा ही बंडखोरीग्रस्त बलुचिस्तान प्रांताची राजधानी आहे.

स्थानिक अहवालानुसार, या स्फोटात 'जाफर एक्सप्रेस' च्या (Jaffer Express) एका डब्याला आग लागली. ही ट्रेन पेशावरसाठी रवाना होणार होती, अशी माहिती आहे.

### बीएलएने स्वीकारली जबाबदारी

या घटनेबाबत प्रसिद्ध झालेल्या निवेदनात, बीएलए (BLA) या संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. त्यांच्या मते, क्वेट्टा छावणीतून जवानांना घेऊन जाणाऱ्या ट्रेनला लक्ष्य करण्याच्या उद्देशाने हा हल्ला करण्यात आला होता. संघटनेने पुढे म्हटले आहे की, या मोहिमेची जबाबदारी त्यांच्या एका विशिष्ट पथकाने घेतली असून, या हल्ल्यात झालेल्या नुकसानीचा सविस्तर तपशील त्यांच्याकडून नंतर प्रसिद्ध केला जाईल. सुरक्षा यंत्रणा या दाव्यांची अधिकृतरीत्या पडताळणी करत आहेत.

### पेशावरला जाणाऱ्या ट्रेनला लक्ष्य

स्थानिक अहवालानुसार, या स्फोटात 'जाफर एक्स्प्रेस' च्या (JAFFER EXPRESS) एका डब्याला आग लागली. ही ट्रेन पेशावरसाठी रवाना होणार होती, अशी माहिती आहे. बलुचिस्तानचे गृहविषयक विशेष सहाय्यक बाबर युसफझाई यांनी सांगितले की, अधिकारी या घटनेबाबत माहिती गोळा करत असून, पडताळणीनंतर अधिक तपशील शेअर केले जातील. सर्व संबंधित संस्थांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे आणि बचाव कार्य सुरू असताना नागरिकांनी स्फोटाच्या ठिकाणी गर्दी टाळावी असे आवाहन त्यांनी केले आहे.

---

## अमेरिकेच्या कडक व्हिसा नियमांवर एस. जयशंकर यांची मार्को रुबिओंबरोबर चर्चा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अमेरिकेच्या कायम नागरिकत्वासाठी आवश्यक असलेल्या ग्रीन कार्डसाठी नियम बदलणार आहेत. यामुळे अमेरिकेत स्थायिक होऊ इच्छिणाऱ्या भारतीयांना भारतात परतून व्हिसासाठी अर्ज करावा लागणार आहे. याबाबत परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांच्याशी चर्चा केली. मार्को रुबियो सध्या भारताच्या दौऱ्यावर आहेत.**



भारतामधून वैध मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अमेरिकेचा व्हिसा मिळवण्यात येणाऱ्या अडचणींवर मार्को रुबिओ यांच्याशी चर्चा केली असल्याचं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. या दोन्ही नेत्यांमध्ये आधी द्विपक्षीय शिष्टमंडळ पातळीवर चर्चा झाली. त्यानंतर घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

"भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंधांचा गाभा दोन्ही देशांतील लोकांचे परस्परांमधील संबंध हाच आहे. मी परराष्ट्र मंत्री रुबिओ यांना वैध प्रवाशांना व्हिसा मिळवताना येणाऱ्या अडचणींची कल्पना दिली. बेकायदेशीर आणि अनियमित स्थलांतराला रोखण्यासाठी आम्ही एकमेकांना सहकार्य करत असलो, तरी याचा विपरित परिणाम कायदेशीर प्रवासावर होणार नाही, अशी आमची अपेक्षा आहे. सरतेशेवटी, आपल्या दोन्ही देशांमधील व्यवसाय, तंत्रज्ञान आणि संशोधन क्षेत्रातील सहकार्यासाठी हे अत्यंत महत्त्वाचं आहे", असं जयशंकर यांनी पत्रकार परिषदेत म्हटले.

रुबिओ यांनी नमूद केलं की, अमेरिका सध्या आपल्या इमिग्रेशन (स्थलांतर) व्यवस्थेचे आधुनिकीकरण करत आहे. अमेरिकेत सध्या स्थलांतराचं मोठं संकट निर्माण झाले आहे. हे भारतामुळे झालेलं नाही, तर गेल्या काही वर्षांत २ कोटींहून अधिक लोकांनी अमेरिकेत बेकायदेशीरपणे प्रवेश केला आहे आणि आम्हाला या आव्हानाचा सामना करावा लागत आहे. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे प्रशासन या व्यवस्थेचे आधुनिकीकरण पूर्ण केल्यानंतर, ही इमिग्रेशन यंत्रणा भारतीयांसाठी काही बाबतीत अधिक फायदेशीर ठरेल, अशी आशाही रुबिओ यांनी व्यक्त केली.

"एकदा आमचं काम पूर्ण झालं आणि आम्ही या व्यवस्थेचं आधुनिकीकरण केलं की, मला वाटतं आपण एका अत्यंत कार्यक्षम आणि आधीच्या व्यवस्थेपेक्षाही उत्तम असलेल्या प्रणालीकडे जाऊ. काही बाबतीत तर ही नवीन यंत्रणा अमेरिकेत काम आणि नाविन्यपूर्ण संशोधन (इनोव्हेशन) करण्यासाठी येऊ इच्छिणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी पूर्वीपेक्षाही अधिक फायदेशीर ठरू शकते", असं त्यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले.

### भारताला लक्ष्य केलेलं नाही

यानंतर जे-१ (J1), एफ-१ (F1) आणि एच-१बी (H-1B) व्हिसासह विविध अमेरिकेच्या व्हिसा श्रेणींमध्ये अलीकडेच झालेल्या बदलांबद्दल विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना रुबिओ यांनी स्पष्ट केलं की, वॉशिंग्टनच्या इमिग्रेशन नियमांमधील हे मोठे बदल भारताला लक्ष्य करून केलेले नाहीत. ही यंत्रणा भारताला लक्ष्य करून तयार केलेली नाही; तर ती जागतिक स्तरावर लागू केली जात आहे. परंतु, सध्या आम्ही एका बदलाच्या टप्प्यातून जात आहोत आणि अशा काळात सुरुवातीला काही अडचणी येणे स्वाभाविक आहे."

# पांढऱ्या रंगाच्या ड्रेसमध्ये ऐश्वर्याचा जलवा

कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ यंदाही भारतीय कलाकारांच्या उपस्थितीने रंगला आहे. मात्र, चाहत्यांचे सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन हिच्या ग्लॅमरस अंदाजाने... तिचा आणखी एक आता समोर आला आहे. कान्समधील ऐश्वर्या रायचा तिसरा लुक समोर आला आहे, एका आकर्षक पांढऱ्या रंगाच्या पँटसूटमध्ये ती दिसून आली. या आउटफिटमध्ये फेदर आणि लेस डिटेलिंग करण्यात आली होती, ज्यामुळे तिचा संपूर्ण लुक अधिक रॉयल दिसत होता. या पँटसूटसोबत तिने परिधान केलेला स्टायलिश ब्लेझर विशेष लक्षवेधी ठरला. ब्लेझरच्या लॅपल्सवर मौल्यवान रत्नांची नक्षी करण्यात आली होती. याशिवाय पंखांनी सजवलेल्या शानदार लुकला एक वेगळाच ग्लॅमरस टच मिळाला. यात तिचे सौंदर्य अधिक खुलले होते. हा आकर्षक आउटफिट प्रसिद्ध चिनी डिझायनर Cheney Chan यांनी डिझाइन केला होता. ऐश्वर्याच्या आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्वामुळे हा लुक आणखी प्रभावी दिसत असल्याची चर्चा फॅशन वर्तुळात रंगली आहे. याआधी कान्सच्या पहिल्या दिवशीही ऐश्वर्याचा लुक चर्चेचा विषय ठरला होता. त्या वेळी ती भारतीय फॅशन डिझायनर अमित अग्रवाल यांनी डिझाइन केलेल्या जलपरी शैलीतील गाऊनमध्ये दिसली होती. तिच्या या लुकचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. त्यानंतर ऐश्वर्याच्या आणखी एका पिंक गाऊन लुकचीही खूप चर्चा झाली. या वेळी तिच्यासोबत मुलगी आराध्या बच्चन देखील उपस्थित होती. आई-मुलीची ही जोडी रेड कार्पेटवर आकर्षणाचे केंद्र ठरली. कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये दरवर्षी ऐश्वर्याच्या लुकची उत्सुकता असतेच. यंदाही तिने आपल्या वेगळ्या स्टाईलने चाहत्यांची मनं जिंकली आहेत.



# मृणाल ठाकूरचं वक्तव्य चर्चेत!



अभिनेत्री मृणाल ठाकूर दिग्दर्शक डेव्हिड धवन यांच्या कॉमेडी विश्वाचा पहिल्यांदाच भाग बनणार आहे. त्यांचा आगामी "है जवानी तो इश्क होना है," हा एक रोमँटिक-कॉमेडी एंटरटेनर चित्रपट असून, यात मृणाल ठाकूर पहिल्यांदाच अभिनेता वरुण धवनसोबत रोमँन्स करताना दिसणार आहे. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, या नव्या जोडीला एकत्रित पाहण्यासाठी चाहते आतुर झाले आहेत. खरंतर मृणाल ठाकूरने आतापर्यंत अनेक चित्रपटांत उल्लेखनीय काम करत महत्वाच्या भूमिका साकारलेल्या आहेत. मृणाल आतापर्यंत गंभीर, भावनिक आणि थ्रिलर चित्रपटांमध्ये दिसली आहे. मात्र, यावेळी ती एका विनोदी आणि मजेशीर कथेचा एक महत्वाचा भाग असणार आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात अभिनेत्रीने कॅमेडी चित्रपटात काम करण्याबाबत एक वक्तव्य केले आहे.

# खिलाडीकुमार दिसणार नव्या अवतारात!



खिलाडी कुमार अर्थात सर्वांचा लाडका अक्षय कुमार त्याच्या 'भूत बंगला' चित्रपटातील वेगळ्या भूमिकेमुळे चर्चेत आला होता. अक्षय कुमारच्या या चित्रपटाला चांगला प्रतिसाद प्रेक्षकांनी दिला. या चित्रपटाच्या यशानंतर आता अक्षय कुमारच्या आगामी चित्रपटांची उत्सुकता चाहत्यांना लागली असून, अशातच त्याच्या हॉलिवूडच्या तोडीस तोड निर्मिती असलेल्या एका चित्रपटाचे नाव समोर आले आहे. तसेच याबाबत महत्वाची अपडेट देखील आली आहे. हा एक स्पाय-ॲक्शन चित्रपट असणार आहे. प्राथमिक माहितीनुसार, या चित्रपटाचे नाव 'समूक' असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. एचटी सिटीच्या वृत्तानुसार, या प्रोजेक्टचे नाव 'समूक' आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन कनिष्क वर्मा करत आहेत. अक्षय कुमार, विपुल अमृतलाल शाह आणि आशिम शाह यांनी याची निर्मिती केली आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना एलियन्सच्या भयानक जगाची एक झलक दाखवेल. विशेष म्हणजे, हॉलिवूडचे स्टंट कोऑर्डिनेटर ल्यूक टंबर हे देखील 'समूक'मध्ये सामील झाले आहेत. त्यांनी 'मिशन: इम्पॉसिबल', 'वेनम' आणि 'प्रिडेटर' यांसारख्या स्पाय-ॲक्श चित्रपटांवर काम केले आहे. अक्षय कुमार लवकरच "वेलकम टू द जंगल" या त्याच्या बहुप्रतिक्षित चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात तगडी स्टारकास्ट असून तब्बल ३५ कलाकारांच्या भूमिका आहेत. यात प्रामुख्याने दिशा पटानी, जॅकलिन फर्नांडिस, जॉनी लिव्हर, अर्शद वारसी आणि सुनील शेट्टी यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार आहेत.

# युकी भांब्री दुहेरीच्या अंतिम फेरीत

## एटीपी टूरवरील स्पर्धेत भांब्रीने पहिल्यांदा दुहेरीची अंतिम फेरी गाठली

**महाईन्यूज । जिनिव्हा**




**एटीपी टूरवरील येथे सुरु असलेल्या जिनिव्हा खुल्या पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेत भारताचा युकी भांब्रीने आपला साथिदार मिचेल व्हिनस समवेत दुहेरीची अंतिम फेरी गाठली.**

2026 च्या टेनिस हंगामातील एटीपी टूरवरील स्पर्धेत भांब्रीने पहिल्यांदा दुहेरीची अंतिम फेरी गाठली आहे. पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात युकी भांब्री आणि त्याचा न्यूझीलंडचा साथिदार मिचेल व्हिनस यांनी झेकच्या रिकी व अॅडम पॅव्हेलासेक यांचा 7-5, 6-3 अशा सरळ सेट्समध्ये पराभव केला. पुरुष दुहेरीच्या दुसऱ्या उपांत्य लढतीत रोमानियाच्या अॅमेडो आणि मार्क पोलमन्स यांनी फ्रेनझ्रेन आणि रॉबिन हॅस यांचा 7-6 (7-4), 6-2 असा पराभव करत अंतिम फेरीत स्थान मिळविले.

युकी भांब्रीच्या सातत्यपूर्ण आणि आक्रमक खेळामुळे भारतीय टेनिस चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नेटजवळील अचूक खेळ आणि उत्कृष्ट समन्वयाच्या जोरावर भांब्री-व्हिनस जोडीने प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखले. पहिल्या सेटमध्ये कडवी झुंज पाहायला मिळाली, मात्र महत्त्वाच्या क्षणी भांब्रीच्या अनुभवाचा संघाला मोठा फायदा झाला. दुसऱ्या सेटमध्ये या जोडीने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत सामना एकतर्फी केला. या विजयामुळे एटीपी टूरवरील भारतीय खेळाडूंची उपस्थिती पुन्हा एकदा ठळकपणे समोर आली आहे. अंतिम सामन्यातही भांब्रीकडून दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# ‘मेस्सी’ बनला अब्जाधीश; ‘रोनाल्डो’नंतर जगातील दुसरा फुटबॉलपटू

**महाईन्यूज । न्यूयॉर्क**



**अर्जेंटिनाचा महान फुटबॉलपटू लियोनेल मेस्सी अधिकृतपणे अब्जाधीशांच्या क्लबमध्ये सामील झाला आहे. ‘ब्लूमबर्ग बिलियनेअर्स इंडेक्स’च्या अहवालानुसार, ही ऐतिहासिक कामगिरी करणारा तो त्याचा दीर्घकालीन प्रतिस्पर्धी ख्रिस्तियानो रोनाल्डोनंतरचा जगातील दुसराच फुटबॉलपटू ठरला आहे.**

ब्लूमबर्गच्या विश्लेषणानुसार, 38 वर्षीय मेस्सीने 2007 पासून केवळ पगार आणि बोनसच्या माध्यमातून 700 दशलक्ष डॉलर्स (सुमारे 521 दशलक्ष पौंड) पेक्षा जास्त कमाई केली आहे. त्यानंतर कर रचना, बाजारपेठेतील चढ-उतार, जागतिक गुंतवणूक आणि विविध नामांकित ब्रँडस्च्या जाहिरातींमधून मिळालेला परतावा या सर्वांचा हिशेब करून मेस्सीची एकूण संपत्ती आता 1 अब्ज डॉलर्सच्या पार गेली आहे.

अल-नासर क्लबचा स्टार खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डो 2023 मध्ये सौदी अरेबियामध्ये गेल्यानंतर अब्जाधीश बनणारा पहिला फुटबॉलपटू ठरला होता, आता इंटर मियामीचा कर्णधार मेस्सीनेही त्याच्याशी बरोबरी केली आहे. रोनाल्डोची संपत्ती मुख्यत्वे त्याच्या आक्रमक मार्केटिंग स्ट्रॅटेजीमुळे वाढली असताना, मेस्सीचा अब्जाधीश बनण्याचा हा प्रवास अधिक संथ आणि सुनियोजित राहिला आहे. अमेरिका तसेच युरोपमधील निवडक ब्रँडस्सोबतच्या भागीदारीच्या जोरावर त्याने हे स्थान मिळवले आहे.

दरम्यान, मेस्सीने उत्तर अमेरिकन फुटबॉल आणि एकूणच तेथील लोकप्रिय संस्कृतीवर पाडलेला प्रभाव एका वेगळ्या उंचीवर पोहोचला आहे. अमेरिकेमध्ये मेस्सीच्या नावाने एका रस्त्याचे नामकरण करण्यात आले आहे. 2026 च्या फिफा विश्वचषक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर, न्यू जर्सीमधील एका स्थानिक टाऊनशिपमधील रस्त्याला ‘लियो मेस्सी वे’ असे नाव देण्यात आले आहे. 2022 मध्ये कतार विश्वचषक जिंकून देणाऱ्या मेस्सीचे नाव आता अमेरिकेच्या भूगोलात कोरले गेले आहे.

मेस्सीच्या या यशामुळे फुटबॉल विश्वात त्याच्या प्रभावाची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. मैदानावरील अप्रतिम कामगिरीसोबतच आर्थिक क्षेत्रातही मेस्सीने मोठा इतिहास रचला आहे. जगभरातील तरुण खेळाडूंसाठी मेस्सी आज प्रेरणेचा सर्वात मोठा स्रोत बनला आहे. इंटर मियामीमध्ये दाखल झाल्यानंतर अमेरिकेतील फुटबॉलची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मेस्सीच्या उपस्थितीमुळे MLS लीगला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळाली आहे. कतार विश्वचषक विजयानंतर मेस्सीची ब्रँड व्हॅल्यू आणखी प्रचंड वाढली आहे.

## फुटबॉलच्या इतिहासात मेस्सीचे नाव अग्रस्थानी

फुटबॉलच्या इतिहासातील सर्वात प्रभावशाली खेळाडूंमध्ये मेस्सीचे नाव अग्रस्थानी घेतले जाते. शांत स्वभाव आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर मेस्सीने हे अभूतपूर्व यश मिळवले आहे. जागतिक ब्रँड्ससोबतच्या भागीदारीमुळे मेस्सीची आर्थिक ताकद अधिक भक्कम झाली आहे. अमेरिकेत त्याच्या नावाने रस्त्याचे नामकरण होणे हा त्याच्या लोकप्रियतेचा मोठा सन्मान मानला जात आहे. फुटबॉलच्या मैदानाबाहेरही मेस्सीने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. मेस्सीच्या प्रत्येक यशामुळे अर्जेंटिनातील चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण होत आहे. गेली दोन दशके फुटबॉल विश्वावर मेस्सी आणि रोनाल्डो यांचे वर्चस्व कायम राहिले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। सोमवार ।
दि. 25 मे 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलचा १२वी (सीबीएसई)चा १०० टक्के निकाल

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल ने यंदा इयत्ता १२वी ( सीबीएसई ) चा बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट निकालाची परंपरा यंदाही कायम ठेवली.**

- गायत्री कुंभार हिने ९६.२० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे तिने भौतिकशास्त्र, जीवशास्त्र आणि योगा या विषयांत ९९ गुण मिळवले.
- ओंकार गायकवाड याने ९४.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला. आयटी विषयात त्याने १०० पैकी ९९ गुण मिळवले.
- अनशूल पनवेलकर याने ९१.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला.

पहिल्या सात विद्यार्थ्यांमध्ये वेदांत पाटील, क्रितीग्या सिंग, अक्षय उलियाथ आणि आदित्य यांनीही ९० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.

या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दिपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा यांनी शाळेच्या प्राचार्या डॉ. वृंदा मुलतानी जोशी, उपप्राचार्या लिझा सोजू, समन्वयिका गुलनाज खान तसेच शिक्षक, पालक व विद्यार्थी यांचे कौतुक के करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

PRATIBHA INTERNATIONAL SCHOOL & JR. COLLEGE



| गायत्री कुंभार | ओंकार गायकवाड | अनशूल पनवेलकर |
|---|---|---|
| ९६.२० % | ९४.८० % | ९१.६० % |

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.




UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# गणित आणि तंत्रज्ञानाचा सेतू

## आजच्या विज्ञान-तंत्रज्ञान विद्यार्थ्यांसाठी करिअर घडविणारा अभ्यासक्रम — एम.एस्सी. (आय.एम.सी.ए.)

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), संख्यात्मक अर्थव्यवस्था, माहितीवर आधारित निर्णयप्रक्रिया आणि संगणकीय संशोधन यांनी आजचा काळ व्यापला आहे. अशा वेळी प्रगत गणिताची शिस्त आणि संगणकशास्त्राची व्यावहारिक ताकद एकत्र वापरू शकणाऱ्या पदवीधरांची मागणी कधी नव्हे इतकी वाढली आहे. एम.एस्सी. (इंडस्ट्रियल मॅथेमॅटिक्स विथ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स) — एम.एस्सी. (IMCA) हा अभ्यासक्रम नेमका याच संगमावर उभा आहे — गणित आणि संगणक यांचा एकत्रित, भविष्यवेधी, समाकलित (integrated) पदव्युत्तर अभ्यासक्रम. पदवी पूर्ण केल्यानंतरचा महत्त्वाचा निर्णय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना या अभ्यासक्रमाची सविस्तर ओळख, करिअरचे महत्त्व, आणि भारतीय उच्च शिक्षण क्षेत्रात तो वेगळा का ठरतो, हे सांगणारा हा लेख आहे.

MAEER'S
MIT | Arts, Commerce & Science College
Affiliated to Savitribai Phule Pune University
Accredited by NAAC with "A" Grade

### १. एम.एस्सी. (IMCA) म्हणजे काय ?

एम.एस्सी. (IMCA) — Integrated Mathematics with Computer Applications — हा दोन वर्षांचा, चार सत्रांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे. यात आधुनिक युगातील दोन सर्वाधिक प्रभावी व रोजगारक्षम शाखा — गणित आणि संगणक उपयोजन — एकत्र शिकविल्या जातात. परंपरागत एम.एस्सी. (गणित) अभ्यासक्रमात केवळ शुद्ध व उपयोजित गणितावर भर असतो, तर एम.सी.ए. अभ्यासक्रमात केवळ सॉफ्टवेअर निर्मितीवर लक्ष केंद्रित असते. परंतु IMCA मध्ये गणितातील खोली आणि संगणकीय कौशल्य यांचे संतुलित संमिश्रण आहे. विद्यार्थी प्रगत विश्लेषण, बीजगणित, अवकलन समीकरणे, संख्यात्मक पद्धती, संक्रिया संशोधन (Operations Research), संभाव्यता व सांख्यिकी या विषयांबरोबरच प्रोग्रामिंग भाषा, डेटा स्ट्रक्चर्स, अल्गोरिदम, डेटाबेस सिस्टीम्स, मशीन लर्निंग आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग यांचाही सखोल अभ्यास करतात.

### २. हा अभ्यासक्रम आजच का महत्त्वाचा ?

जागतिक अर्थव्यवस्था आता गणितीय अल्गोरिदम्सच्या आधारे नव्याने लिहिली जात आहे. प्रत्येक रेकमेंडेशन सिस्टीम, फसवणूक-ओळख प्रणाली, स्वायत्त वाहन (autonomous vehicle), क्रिप्टोकरन्सी प्रोटोकॉल, हवामान प्रारूप, आणि AI सहायक हे सर्व प्रमेये, समीकरणे व संगणकीय तर्कशास्त्र यांच्या पायावरच उभे आहेत. आजचे उद्योग केवळ एका शाखेतील तज्ज्ञ शोधत नाहीत — त्यांना अशा व्यावसायिकांची गरज आहे जे एखाद्या समस्येचे गणितीय प्रारूप मांडू शकतील आणि त्याचे समाधान संगणकीय पद्धतीने अमलात आणू शकतील. ही नेमकी मागणी एम.एस्सी. (IMCA) चे पदवीधर पूर्ण करतात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) मध्ये बहुशाखीय, समाकलित अभ्यासक्रमांची स्पष्ट शिफारस करण्यात आली आहे, जे शाखांमधील पारंपरिक भिंती मोडतात. एम.एस्सी. (IMCA) हा अशाच प्रकारचा अभ्यासक्रम आहे — सर्वांगीण, कौशल्याभिमुख आणि संशोधनसक्षम पदव्युत्तर शिक्षणाची NEP ची संकल्पना तो प्रत्यक्षात आणतो.

### ३. अभ्यासक्रमाची ठळक वैशिष्ट्ये

**अभ्यासक्रमात पुढील प्रमुख क्षेत्रांचा काळजीपूर्वक समावेश केला आहे :**

**मूलभूत गणित**

- वास्तव व सम्मिश्र विश्लेषण (Real and Complex Analysis), टोपोलॉजी, फंक्शनल ॲनालिसिस
- रेखीय बीजगणित (Linear Algebra), अमूर्त बीजगणित आणि विवक्त गणित (Discrete Mathematics)
- साधारण व आंशिक अवकलन समीकरणे (ODE व PDE)
- संख्यात्मक विश्लेषण आणि संगणकीय गणित
- संभाव्यता सिद्धांत, गणितीय सांख्यिकी आणि स्टोकॅस्टिक प्रक्रिया
- संक्रिया संशोधन (Operations Research), इष्टतमीकरण व आलेख सिद्धांत

**संगणक उपयोजन**

- C, C++, Python व Java मधील प्रोग्रामिंग
- डेटा स्ट्रक्चर्स, अल्गोरिदम व त्यांचे डिझाइन विश्लेषण
- डेटाबेस मॅनेजमेंट सिस्टीम (DBMS) व SQL
- ऑपरेटिंग सिस्टीम्स, कॉम्प्युटर नेटवर्क्स आणि सायबर सुरक्षेची मूलतत्त्वे
- सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग व ऑब्जेक्ट-ओरिएंटेड डिझाइन
- मशीन लर्निंग, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्स
- वेब टेक्नॉलॉजीज् व मोबाइल ॲप्लिकेशन डेव्हलपमेंट

**समाकलित व उपयोजित घटक**

- गणितीय प्रारूपीकरण आणि सिम्युलेशन (Mathematical Modelling & Simulation)
- संगणकीय रेखीय बीजगणित व वैज्ञानिक संगणन (Scientific Computing)
- क्रिप्टोग्राफी व माहिती सुरक्षा
- अर्थगणित आणि संख्यात्मक विश्लेषण (Financial Mathematics & Quantitative Analysis)
- औद्योगिक इंटर्नशिप आणि प्रमुख संशोधन प्रकल्प (सत्र IV)

### ४. एम.एस्सी. (IMCA) नंतरच्या करिअर संधी

एम.एस्सी. (IMCA) निवडण्यामागील एक प्रबळ कारण म्हणजे या अभ्यासक्रमातून खुलणाऱ्या करिअर संधींची प्रचंड व्याप्ती. संख्यात्मक तर्क किंवा सॉफ्टवेअर प्रणाली यांवर आधारित जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात पदवीधर सहज प्रवेश करू शकतात :

**माहिती तंत्रज्ञान व सॉफ्टवेअर**

सॉफ्टवेअर इंजिनिअर, फुल-स्टॅक डेव्हलपर, सिस्टीम्स ॲनालिस्ट, DevOps इंजिनिअर, क्लाउड सोल्युशन्स आर्किटेक्ट — TCS, Infosys, Wipro, Cognizant, Persistent, IBM, Accenture तसेच उदयोन्मुख स्टार्ट-अप्समध्ये.

**डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता व विश्लेषणे**

डेटा सायंटिस्ट, मशीन लर्निंग इंजिनिअर, AI संशोधक, बिझनेस इंटेलिजन्स ॲनालिस्ट, NLP स्पेशालिस्ट — आजच्या नोकरीच्या बाजारातील सर्वाधिक वेतन देणाऱ्या भूमिकांपैकी या आहेत. मजबूत कौशल्य असलेल्या नवीन पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी सरासरी प्रारंभिक वेतन वर्षाला ₹६ ते ₹१४ लाखांच्या दरम्यान असते.

**बँकिंग, अर्थक्षेत्र आणि विमागणित (Actuarial)**

क्वांटिटेटिव्ह ॲनालिस्ट (Quant), रिस्क ॲनालिस्ट, इन्व्हेस्टमेंट बँकिंग ॲनालिस्ट, ॲक्च्युरियल असोसिएट, फिनटेक डेव्हलपर — JP Morgan, Goldman Sachs, Morgan Stanley, Deutsche Bank, HDFC, ICICI आणि अन्य आघाडीच्या संस्थांमध्ये. IMCA मधून मिळणारा गणितीय पाया हाच या कंपन्यांना आवश्यक असतो.

**संशोधन व उच्च शिक्षण**

IITs, IISc, IISERs, TIFR, CMI आणि आंतरराष्ट्रीय विद्यापीठांत गणित, संगणकशास्त्र, संगणकीय विज्ञाने व आंतरशाखीय क्षेत्रांत पीएच.डी. साठी थेट पात्रता. पदवीधर CSIR-UGC NET, GATE आणि SET या स्पर्धा परीक्षांना बसण्यास पात्र असतात.

**सरकारी सेवा व सार्वजनिक क्षेत्र**

भारतीय सांख्यिकी सेवा (ISS), UPSC नागरी सेवा (गणित ऐच्छिक विषय म्हणून), DRDO, ISRO, BARC, बँकिंग प्रोबेशनरी अधिकारी, आणि CSIR प्रयोगशाळांतील वैज्ञानिक पदे.

**अध्यापन व शैक्षणिक क्षेत्र**

सहाय्यक प्राध्यापक (NET/SET उत्तीर्ण झाल्यावर), शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील गणित प्राध्यापक, अभ्यासक्रम विकसक, आणि Byju's, Unacademy, Vedantu, Cuemath सारख्या EdTech कंपन्यांमध्ये कंटेंट स्पेशालिस्ट.

### ५. विद्यार्थ्यांना प्राप्त होणारी कौशल्ये

अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांकडे एक सशक्त, बाजारात मागणी असलेले कौशल्य-संच तयार होतो :

- उच्च स्तरावरील विश्लेषणात्मक व अमूर्त तर्कशक्ती
- वास्तविक जगातील समस्यांचे गणितीय प्रारूपीकरण
- अनेक प्रोग्रामिंग भाषांत व संगणकीय साधनांत प्रावीण्य
- डेटा विश्लेषण, मशीन लर्निंग व सांख्यिकीय संगणनात प्रत्यक्ष अनुभव
- संशोधन पद्धती, वैज्ञानिक लेखन व सादरीकरण कौशल्ये
- सांघिक काम, प्रकल्प व्यवस्थापन व उद्योग-केंद्रित समस्या-निवारण

### ६. हा अभ्यासक्रम कोणी निवडावा ?

एम.एस्सी. (IMCA) हा अभ्यासक्रम पुढील विद्यार्थ्यांसाठी आदर्श आहे :

- गणित, सांख्यिकी, संगणकशास्त्र किंवा संबंधित

शाखांतील बी.एस्सी. पदवीधर, तसेच द्वितीय वर्षापर्यंत गणित घेतलेले पदवीधर — ज्यांना प्रगत व आंतरशाखीय विशेषीकरण करायचे आहे

- बी.सी.एस्. व बी.एस्सी. (सीएस्) पदवीधर — ज्यांना AI, ML आणि क्वांटिटेटिव्ह कॉम्प्युटिंग मधील उच्च भूमिकांसाठी गणितीय पाया मजबूत करायचा आहे
- गणितीय शास्त्रे, संगणकशास्त्र किंवा संगणकीय अभियांत्रिकी या क्षेत्रांत पीएच. डी. किंवा संशोधन करिअरची आकांक्षा असणारे विद्यार्थी
- NET, GATE, ISS आणि UPSC यांसारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे उमेदवार — जिथे गणित आणि तर्कशक्ती निर्णायक असतात
- ज्यांना समस्या सोडवणे, तर्कसंगत विचार आणि मूलभूत तत्त्वांपासून प्रत्यक्ष प्रणाली उभारणे यांची मनापासून आवड आहे, असे जिज्ञासू विद्यार्थी

### ७. एम.एस्सी. (IMCA) — MITACSC, आळंदी (दे.), पुणे येथेच का ?

MAEER चे एम.आय.टी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (MITACSC), आळंदी (दे.), पुणे — येथे एम.एस्सी. (IMCA) अभ्यासक्रम विशिष्ट संस्थात्मक वैशिष्ट्यांसह उपलब्ध आहे :

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त (Autonomous) महाविद्यालय तसेच भारतातील सर्वाधिक प्रतिष्ठित शिक्षण समूहांपैकी एक असलेल्या MIT शिक्षण समूहाचे अंगभूत सदस्य
- अनुभवी प्राध्यापक वर्ग — पीएच.डी. प्राप्त गणिततज्ज्ञ, ज्यांच्या pseudodifferential operators, integral transforms, संख्यात्मक विश्लेषण आणि विशेष फलने (special functions) या विषयांत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन प्रकाशने आहेत
- अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळा, अति-वेगवान इंटरनेट पायाभूत सुविधा, आणि MATLAB, R, Python व आधुनिक AI/ML टूलचेन्ससाठी अधिकृत परवानाधारक सॉफ्टवेअर
- अध्यापन, अध्ययन आणि संशोधनात अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता समाकलित करणारा समर्पित AI Capacity Building Initiative (AICBI) उपक्रम
- उद्योगाशी सुसंगत अभ्यासक्रम — इंटर्नशिप, प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि प्रत्यक्ष औद्योगिक प्रकल्प
- मजबूत प्लेसमेंट सहाय्य, माजी विद्यार्थी जाळे, आणि पुण्याच्या आय.टी. व फिनटेक पट्ट्यातील MIT समूहाच्या उद्योग भागीदारींची उपलब्धता
- नियमित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंवाद, परिषदा आणि प्राध्यापक विकास कार्यक्रमांसह जिवंत संशोधन-संस्कृती

### ८. विद्यार्थी व पालकांसाठी संदेश

पदव्युत्तर अभ्यासक्रमाची निवड हा प्रत्येक तरुणाच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय असतो. पालक स्वाभाविकपणे असा अभ्यासक्रम शोधतात ज्यात बौद्धिक खोली, रोजगारक्षमता आणि दीर्घकालीन उपयोगिता या तिन्ही गोष्टी एकत्र असतील. एम.एस्सी. (IMCA) हा या तिन्ही निकषांवर खरा उतरतो. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्याला कोणत्याही एका उद्योगात बद्ध करत नाही — उलट, भविष्यातील नोकरी कोणत्याही दिशेने वळली — कृत्रिम बुद्धिमत्ता, फिनटेक, वैज्ञानिक संशोधन, सार्वजनिक प्रशासन, किंवा उद्योजकता — कोणत्याही दिशेला विद्यार्थी आत्मविश्वासाने यशस्वी होऊ शकेल अशी पायाभूत तर्कशक्ती व तांत्रिक कौशल्य त्याच्यात रुजवतो.

महान भौतिकशास्त्रज्ञ गॅलिलिओने म्हटले होते — “गणित ही ती भाषा आहे ज्यात विश्व लिहिले गेले आहे.” संगणक उपयोजन ही ती साधने आहेत ज्यांच्या मदतीने आज आपण ती भाषा वाचतो, समजून घेतो आणि तिच्यानुसार कृती करतो. एम.एस्सी. (IMCA) विद्यार्थ्यांना या दोन्ही गोष्टी — सहजपणे, आत्मविश्वासाने आणि सर्जनशीलपणे — करायला शिकवतो.



लेखक : डॉ. बाळासाहेब बा. वाफारे
**गणित विभागाचे प्राध्यापक व प्राचार्य, MAEER चे एम.आय.टी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (MITACSC), आळंदी (दे.), पुणे**

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पात सौरऊर्जा वापर; दरवर्षी 20 कोटींची बचत

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या (पीएमआरडीए) हिंजवडी ते शिवाजीनगर या पुणेरी मेट्रो प्रकल्पात पर्यावरणपूरक आणि ऊर्जा बचतीवर आधारित अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आला आहे. सौर ऊर्जा आणि थर्ड रेल सिस्टीमच्या वापरामुळे मेट्रोच्या वार्षिक वीज खर्चात सुमारे 20 कोटी रुपयांची बचत होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.**




या मार्गावरील सर्व 23 उन्नत स्थानकांवर तसेच कार डेपोच्या छतांवर सौर ऊर्जा पॅनेल्स बसवण्यात येत आहेत. एकूण 11 मेगावॉटपेक्षा अधिक क्षमतेचे सोलर प्लांट उभारले जात असून, त्यातून निर्माण होणारी वीज स्थानकांवरील दिवे, लिफ्ट, एस्कलेटर आणि वातानुकूलित यंत्रणांसाठी वापरली जाणार आहे. ही यंत्रणा मुख्य वीज ग्रीडशी जोडण्यात येणार असल्याने विजेचा कार्यक्षम वापर शक्य होणार आहे.

हा प्रकल्प रेस्को मॉडेलवर राबवण्यात येत असल्याने पीएमआरडीएला प्रारंभी कोणताही भांडवली खर्च करावा लागलेला नाही. खासगी कंपनीने स्व:खर्चाने सौर यंत्रणा उभारून तिची देखभालही स्वीकारली आहे.

मेट्रोच्या डब्यांची निर्मिती हलक्या ॲल्युमिनियम धातूपासून करण्यात आली असून, त्यामध्ये री-जनरेटिव्ह ब्रेकिंग तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. त्यामुळे ब्रेक लावताना निर्माण होणारी अतिरिक्त वीज पुन्हा वापरता येणार आहे.

याशिवाय, शहराचे सौंदर्य टिकवण्यासाठी ओव्हरहेड तारांऐवजी आधुनिक थर्ड रेल सिस्टीमचा वापर करण्यात आला आहे. 750 व्होल्ट डीसी वीजप्रवाह असलेल्या या प्रणालीद्वारे मेट्रो गाड्यांना थेट वीजपुरवठा केला जाणार असून, ही यंत्रणा सुरक्षित आणि कार्यक्षम मानली जाते.

# ‘गोल्डन अवर’ धोक्यात

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा ‘गोल्डन अवर’ रस्त्यावरच खर्ची पडत असल्याने रुग्णांच्या जीविताचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. वाढती वाहनसंख्या आणि अपुरी वाहतूक शिस्त यामुळे आपत्कालीन सेवांचा वेग मंदावला असून, यावर ठोस उपाययोजनांची गरज व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत शहरातील रुग्णवाहिका खरोखरच वेळेत रुग्णालय गाठू शकतात का ? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

वाहतूक नियमांनुसार रुग्णवाहिकेला प्राधान्य देणे बंधनकारक असले तरी अनेक वाहनचालक सायरनकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. काही जण कानात इअरफोन लावून वाहन चालवतात. तर, काही जण रुग्णवाहिकेच्या मागे जागा मिळवण्यासाठी धोकादायक पद्धतीने वाहन चालवत असल्याचेही दिसून येते. ज्यामुळे पुन्हा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

हृदयविकाराच्या झटक्यात प्रत्येक मिनिटाला हृदयाच्या पेशींचे नुकसान वाढते. ब्रेन स्ट्रोकमध्ये उपचाराला उशीर झाल्यास कायमस्वरूपी अपंगत्वाचा धोका वाढतो. तर, गंभीर अपघातातील रक्तस्राव असलेल्या रुग्णासाठी वेळेवर उपचारच जीवन-मृत्यूचा फरक ठरू शकतात. त्यामुळे रुग्णवाहिकेला दिलेला मार्ग हा केवळ वाहतूक शिस्तीचा भाग नसूनख एक सामाजिक कर्तव्य आहे. शहरातील काही प्रमुख चौकांमध्ये रुग्णवाहिका सायरन वाजवत पुढे जाण्याचा प्रयत्न करत असतानाही वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसतात. काही वाहनचालक बाजूला सरकत असले तरी रस्त्यावरील अतिक्रमण, बेशिस्त पार्किंग आणि खड्ड्यांमुळे रुग्णवाहिकेचा वेग मंदावतो.




Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046